फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रियांका अनंत भंडारकर** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : अन्न सुरक्षा अधिकारी, पेण |
| निवासस्थान | : | स्वप्नपूर्ती रेसीडन्सी, मु.पो.ता. पेण, जि.रायगड |

**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत**:

१. सध्या मी अन्न व औषध प्रशासन (म. राज्य), रायगड–पेण या कार्यालयात अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत आहे. दि. ३१/१२/२००९ रोजी माझी सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन, रायगड–पेण येथे अन्न निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्तीपत्राची सत्यप्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. **४०** देण्यात येत आहे. मी दि. २८/०६/२०१० ते १९/१०/२०१० या कालावधीत अन्न (आरोग्य) प्राधिकरणांतर्गत अन्न तपासणी आणि नमुने कार्याबाबतचे तीन महिन्यांचे प्रशिक्षण घेतलेले आहे. त्याबाबतच्या दि. १२/११/२०१० रोजीच्या आयुक्तांची स्वाक्षरी असलेले प्रशिक्षण प्रमाणपत्राची सत्यप्रत न्यायालयात दाखल केली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र**. **४१** देण्यात येते. दि. ३०/११/२०१० रोजीच्या अधिसुचनेनुसार माझी अन्न निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली असून अधिसुचनेमध्ये अनु.क्र. ४० वर माझे नाव नमूद आहे. सदर अधिसुचनेची सत्य प्रत न्यायालयात दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र**. **४२** देण्यात येत आहे. दि. ०१/०८/२०११ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र अधिसुचनेनुसार माझी अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून

अधिसुचनेमध्ये अनु.क्र. २१६ वर माझे नाव नमूद आहे. सदर राजपत्र अधिसुचनेची सत्यप्रत न्यायालयात दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. ४३** देण्यात येत आहे.

२. दि. ३१/०५/२०१७ रोजीच्या बदली आदेशान्वये माझी बदली अन्न आणि औषध प्रशासन (म. राज्य) बृहन्मुंबई येथून रायगड–पेण येथे झाल्याने मी दि. ०९/०६/२०१७ ते ०९/०८/२०२१ या कालावधीत सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन (म.राज्य), रायगड–पेण या कार्यालयात अन्न सुरक्षा अधिकारी म्हणून कार्यरत होते. सदर बदली आदेशाची सत्यप्रत दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येत आहे.

३. आरोपी श्री. योगेश भालचंद्र पाटील हे मे. श्री कृपा फुड्स अँड बेव्हरेजेस, ४६२, गणेश नगर, पो. कामार्ली, ता. पेण, जिल्हा रायगड या आस्थापनेचे मालक व विक्रेता आहेत. दि. ०१/१२/२०१८ रोजी सकाळी १०:३० वाजता, मी श्री. दि. तु. संगत, पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न), रायगड–पेण, श्री. रा. मा. भरकड, अन्न सुरक्षा अधिकारी, रायगड–पेण व पंच साक्षीदार श्री. दत्ता नामदेव वाघ यांचे समवेत मे. श्री कृपा फुड्स अँड बेव्हरेजेस, ४६२, गणेश नगर, पो. कामार्ली, ता. पेण, जि. रायगड या आस्थापनेस भेट दिली. त्यावेळी आरोपी सदर आस्थापनेत उपस्थित होता. त्यानंतर मी माझे ओळखपत्र दाखवून येण्याचा उद्देश सांगितला. मी आरोपीस त्याचे नाव विचारले असता त्याने स्वत:चे नाव श्री. योगेश भालचंद्र पाटील असून सदर पेढीचा मालक असल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझ्या सहकाऱ्यांसमवेत सदर आस्थापनेची तपासणी केली असता सदर आस्थापनेमध्ये पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ) या

अन्न पदार्थाचे उत्पादन करून विक्रीसाठी साठवले गेले असल्याचे व सदर अन्न व्यवसायाकरिता आस्थापनेने अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ नुसार आवश्यक परवाना व भारतीय मानक ब्युरोचे (बी.आय.एस.) प्रमाणपत्र घेतले नसल्याचे आढळले. मी सदर आस्थापनेची तपासणी करून तपासणी अहवाल तयार केला व त्याची एक प्रत आरोपीस दिली. सदर तपासणी अहवालावर माझी, पंच साक्षीदार व आरोपीची सही आहे. सदर तपासणी अहवालाची मूळ प्रत मा. न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ४५** देण्यात येत आहे.

४.        सदर आस्थापनेमध्ये विक्रीसाठी उत्पादन केलेल्या पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ) या अन्नपदार्थाच्या २० लिटरचे ४ पॅक्ड जार्सची मी आरोपीकडे विश्लेषणासाठी विकत मागणी केली व सदर अन्नपदार्थाची आरोपी यांच्या मागणीनुसार होणारी एकूण किंमत रू. ६००/— आरोपीस रोख देऊन त्याबाबत कॅश मेमो घेतला. सदर कॅश मेमोवर आरोपी व पंचसाक्षीदार यांची सही आहे. सदर कॅश मेमोची मूळ प्रत दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ४६** देण्यात येत आहे.

५.        सदर अन्नपदार्थ विश्लेषणासाठी पाठविणार असल्याबाबतची लेखी जाणीव फॉर्म VA ची प्रत देऊन आरोपीस सांगितले व त्याची प्रत आरोपीस दिली त्यावर माझी, पंच साक्षीदार व आरोपीची सही आहे. सदर फॉर्म VA ची स्थळप्रत न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ४७** देण्यात येते. तसेच नियम २.४.१.४ खालील नोटीस देऊन सदरील अन्न पदार्थाच्या पुरवठादाराबाबत चौकशी केली व नियम २.४.५ अंतर्गत अन्न नमुन्याचा चौथा भाग NABL Accredited / Notified प्रयोगशाळेत विश्लेषणाकरिता पाठवण्याबाबत विचारणा केली व

त्याची एक प्रत आरोपीस दिली. त्यावर माझी, पंच साक्षीदार व आरोपीची सही आहे. सदर नोटीशीची स्थळ प्रत दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. ४८ देण्यात येत आहे.

६. त्यानंतर मी विश्लेषणासाठी घेतलेले “पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ)” २० लिटरचे एक पॅक्ड जार म्हणजे एक भाग असे सदर अन्नपदार्थाचे चार समान भाग केले. नंतर पंच साक्षीदार, आरोपी व माझी सही असलेले विहीत नमुन्यातील लेबल प्रत्येक भागावर डिंकाने घट्ट चिकटवले. यानंतर अन्न नमुन्याचा प्रत्येक भाग स्वतंत्ररित्या जाड तपकिरी पेपरमध्ये गुंडाळून पेपरची टोके निट आत दुमडून डिंकाने घट्ट चिकटवली. नंतर प्रत्येक भागावर पदावधित अधिकारी, रायगड–पेण यांची सही, कोड क्र RGD/DO–24 व सिरीयल क्रमांक २७७५ नमूद असलेली पेपर स्लिप खालून वर गोलाकार गुंडाळून डिंकाने घट्ट चिकटविली. नंतर प्रत्येक भागावर आरोपीने व पंचसाक्षीदाराने क्रॉस सह्या अशा रितीने केल्या की सहीचा काही भाग पेपर स्लिपवर व उर्वरीत भाग तपकिरी पेपरवर आहे. नंतर प्रत्येक भाग स्वतंत्ररित्या दोऱ्याने उभा आडवा गुंडाळून घट्ट बांधला. नंतर प्रत्येक भागावर पितळी मोहोरच्या सहाय्याने लाखेची चार सिले ठळकपणे अशा प्रकारे उमटवली की, एक सिल अन्न नमुन्याच्या तोंडावर, बुडावर व दोन अन्न नमुन्याच्या पृष्ठभागी, पैकी एक सिल दोऱ्याच्या गाठीवर आहे.

७. नंतर अन्न नमुन्याचे सर्व सिलबंद भाग मी स्वतःच्या ताब्यात घेतले व सदर आस्थापनेकडे अन्न परवाना, बी.आय.एस. प्रमाणपत्र नसल्याने व नमूना कमी दर्जाचा तसेच लेबलदोष असल्याकारणाने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ)–२४० लिटर किंमत १,८००/–, रिकामे जार–१६, किंमत

१,९२०/— आणि सीलिंग कॅप्स १२५/—, किंमत ६२.५/— एकूण किंमत ३,७८०.५०/— चा उर्वरित साठा जप्त करून जप्त साठ्याचा तपशील फॉर्म II व फॉर्म III मध्ये नमूद करून त्याची एक एक प्रत आरोपीस दिली. वरील दोन्ही फॉर्म्सवर माझी, आरोपी व पंचसाक्षीदार यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. सदर फॉर्म II आणि फॉर्म III ची स्थळप्रत न्यायालयात दाखल केली असून फॉर्म II यास **निशाणी क्र**. **४९** आणि फॉर्म III यास **निशाणी क्र ५०** देण्यात येते. सदर घटनेचा मेमोरंडम तयार करून एक प्रत आरोपीस दिली व पोच घेतली. त्यावर माझी, पंचसाक्षीदार व आरोपी यांची सही आहे. सदर मेमोरंडमची मूळ प्रत व इतर कागदपत्र मी न्यायालयात दाखल केली असून त्यातील मजकूर खरा आहे व त्यास **निशाणी क्र**. **५१** देण्यात येते.

८. तपासणीवेळी सदर पेढीने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत परवाना तसेच भारतीय मानक ब्युरोचे प्रमाणपत्र घेतलेले नसल्याने सदर पेढीस कलम १८ नुसार व्यवसाय बंद ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले होते व त्याबाबत पोच घेतली. सदर आदेशावर माझी, आरोपी व पांच साक्षीदार यांची सही आहे. सदर आदेशाची स्थळ प्रत न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. **५२** देण्यात येते.

९. त्यानंतर मी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर (स्कायवर्थ) या अन्न नमुन्याचा एक सीलबंद भाग दि. ०३/१२/२०१८ रोजी अन्न विश्लेषक, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांना फॉर्म VI मधील मूळ प्रतीसह सिलबंद लिफाफ्यात तसेच नमुने सिल करण्यासाठी वापरलेल्या सिलच्या स्पेसिमन इम्प्रेशनची प्रत व फॉर्म VI ची प्रत स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात अन्न विश्लेषक,

पुणे यांना हस्ते वितरणाने पाठविला परंतु त्या दिवशी स्थानिक सुट्टी असल्याने प्रयोगशाळा बंद होती. त्यामुळे दि. ०४/१२/२०१८ रोजी पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर (स्कायवर्थ) या अन्न नमुन्याचा एक सीलबंद भाग, फॉर्म VI मधील मूळ प्रतीसह सिलबंद लिफाफ्यात तसेच नमुने सिल करण्यासाठी वापरलेल्या सिलच्या स्पेसिमन इम्प्रेशनची प्रत व फॉर्म VI ची प्रत स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात अन्न विश्लेषक, पुणे यांना हस्तेवितरणाने पाठविला. सदर फॉर्म VI ची स्थळ प्रत न्यायालयात दाखल केली असून त्यावर माझी सही आहे व त्यास **निशाणी क्र. ५३** देण्यात येत आहे. अन्न नमुना आणि सिलबंद पाकिटासंदर्भात दि. ०४/१२/२०१८ रोजीच्या पोच पावतीची मूळ प्रत न्यायालयात दाखल करण्यात आली असून त्यास **निशाणी क्र. ५४** देण्यात येत आहे.

१०. दि. ०३/१२/२०१८ रोजी वरील अन्न नमुन्याचा एक भाग विश्लेषणासाठी अन्न विश्लेषक, पुणे येथे पाठविल्याबाबत अन्न सुरक्षा मानके कायदा, २००६ चे कलम ४७(१)(ब)(प) अंतर्गत सूचनापत्र पदावधित अधिकारी, रायगड यांना हस्तबटवड्याने देण्यात आले. त्याबाबतची पोच फिर्यादी यांच्याकडे आहे. त्याच्या स्थळप्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यावर माझी सही असून त्यास **निशाणी क्र. ५५** देण्यात येते. दि. ०३/१२/२०१८ रोजी वरील अन्न नमुन्याचे उर्वरीत दोन सिलबंद भाग, फॉर्म VI च्या दोन प्रती, स्पेसिमन इम्प्रेशन सिलच्या दोन प्रती सिलबंद पॅकेटमध्ये कव्हरिंग लेटरसह पदावधित अधिकारी, रायगड–पेण यांना कलम ४७ (1) (c)(ii) नियम २.४.१.१० (ii) अंतर्गत हस्तेबटवड्याने दिले व त्याबाबतची पोच घेतली. त्याची स्थळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यावर माझी सही असून त्यास **निशाणी क्र. ५६** देण्यात येत

आहे. आरोपीने अन्न नमुन्याचा चौथा भाग अधिकृत प्रयोगशाळेस पाठविण्याबाबत विनंती न केल्याने कलम ४७(१)(c)(iii) अंतर्गत मी अन्न नमुन्याचा चौथा भाग आवरणपत्रासह पदावधित अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, रायगड यांच्याकडे सिलबंद लिफाफ्यात हस्ते बटवड्याने दि. ०३/१२/२०१८ रोजी दिला. त्याबाबतची पोच माझ्याकडे आहे. सदर आवरणपत्राची स्थळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यावर माझी सही असून त्यास **निशाणी क्र**. **५७** देण्यात येत आहे. अन्न विश्लेषक, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांना दि. ०४/१२/२०१८ रोजी अन्न नमुन्याचा सिलबंद भाग व स्पेसिमन इम्प्रेशनची प्रत व फॉर्म VI प्रतीबाबत स्वतंत्र सीलबंद पॅकेट मिळल्याबाबतच्या २ पोच पावत्या मी न्यायालयात दाखल केल्या असून त्यास **निशाणी क्र ५८** व **५९** देण्यात येत आहे.

११. दि. ०५/१२/२०१८ रोजी पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न) अन्न व औषध प्रशासन, रायगड यांनी आरोपीस विनापरवाना नोटीस डाक नोंदद्वारे पाठविली. सदर नोटीशीवर पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न) रायगड–पेण यांची सही आहे. सदर नोटीशीची स्थळ प्रत न्यायलयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. **६०** देण्यात येत आहे.

१२. मला दि. १०/०१/२०१९ रोजी पदावधित अधिकारी यांच्या दि. ०८/०१/२०१९ रोजीच्या ज्ञापनासोबत पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर (स्कायवर्थ) या अन्न नमुन्याचा विश्लेषण अहवाल ३७९/१४९० दि. १८/१२/२०१८ प्राप्त झाला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता अन्न विश्लेषक, पुणे यांनी सदर अन्न नमुन्यामध्ये Aerobic Microbial Count मानकापेक्षा जास्त आढळून आल्याने

सदर अन्न नमुना असुरक्षित तसेच सदर अन्न पदार्थाच्या लेबलवर बॅच नंबर, उत्पादन दिनांक व बेस्ट बिफोर दिनांक, अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ नुसार आवश्यक परवाना व भारतीय मानक ब्युरोचे (बी.आय.एस.) प्रमाणपत्र नमूद केले नसल्याने सदर अन्न नमुना मिथ्याछाप असल्याने घोषित केले आहे. सदर ज्ञापनाची व विश्लेषण अहवालाची मूळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास अनुक्रमे **निशाणी क्र ६१** व **६२** देण्यात येते.

१३. आरोपीच्या ताब्यात ठेवलेल्या जप्त केलेल्या साठ्याबाबत पुढील आदेश होण्याबाबत दि. १४/०१/२०१९ रोजी पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न), अन्न व औषध प्रशासन (म.रा.) रायगड यांच्यासमोर अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कलम ४७ (४) अन्वये मी किरकोळ अर्ज क्र. ७७/२०१९ दाखल केला. सदर अर्जावर माझी सही आहे. सदर किरकोळ अर्जाची स्थळ प्रत न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. **६३** देण्यात येते. सदर किरकोळ अर्जावर दि. १४/०१/२०१९ रोजी जप्त साठा योग्य त्या आदेशास्तव मा. न्यायनिर्णय अधिकारी तथा सह आयुक्त (अन्न), कोकण विभाग, अन्न व औषध प्रशासन (म.राज्य), ठाणे यांचेकडे सादर करण्याबाबत पदावधित अधिकारी, रायगड यांचे आदेश प्राप्त झाले असून सदर आदेशावर श्री. दि. तु. संगत यांची सही आहे. सदर आदेशाची मूळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६४** देण्यात येत आहे.

१४. सदर आदेशाच्या अनुषंगाने मी सदर जप्त साठा योग्य त्या आदेशास्तव मा. न्यायनिर्णय अधिकारी, ठाणे यांच्याकडे किरकोळ अर्ज क्र. ०५/२०१९, दि. १५/०१/२०१९ रोजी सादर केला. त्यावर माझी स्वाक्षरी आहे.

सदर किरकोळ अर्जाची स्थळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येत आहे. सदर किरकोळ अर्जावर दि. १५/०६/२०१९ रोजी न्यायनिर्णय अधिकारी (कोकण विभाग), ठाणे यांनी जप्त साठा आरोपीच्या खर्चाने नष्ट करण्याचे आदेश दिले. सदर आदेशावर श्री. एस्. एस्. देसाई मा. न्यायनिर्णय अधिकारी तथा सह आयुक्त (अन्न), कोकण विभाग, अन्न व औषध प्रशासन (म. राज्य), ठाणे यांची सही आहे. सदर आदेशाची झेरॉक्स प्रत मी न्यायालयात दाखल केली आहे. सदर आदेशान्वये दि. २१/११/२०१९ रोजी जप्त केलेला सर्व साठा पंचा समक्ष नष्ट करण्यात आला. सदर पंचनाम्यावर माझी, आरोपी व पंच साक्षीदार यांची सही आहे व पंचनाम्याची मूळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६६** देण्यात येत आहे.

१५. दि. २८/०१/२०१९ रोजी मी आरोपीला आस्थापनेच्या माहितीबाबत पत्र पाठवले. त्यावर माझी सही आहे. सदर पत्राची स्थळ प्रत दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६७** देण्यात येत आहे. दि. १६/०२/२०१९ रोजी मला आरोपीकडून आस्थापनेच्या माहितीबाबत पत्र मिळाले. सदर पत्रामध्ये आरोपीने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ) त्याच्या आस्थापनेमध्ये तयार केले गेले असल्याचे व आस्थापनेकडे अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत परवाना आणि बी. आय.एस. प्रमाणपत्र नसल्याचे नमूद केले आहे. सदर पत्रावर आरोपीची सही आहे. सदर पत्राची मूळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६८** देण्यात येत आहे.

१६. आरोपीने दि. ०१/१२/२०१८ रोजी असुरक्षित पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर (स्कायवर्थ) या अन्नपदार्थांचे विक्रीकरीता उत्पादन, विक्रीकरीता साठा व विक्री

केल्याबाबत त्यांचेविरूध्द न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी मंजुरी आदेश मिळणेबाबत मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांना सादर करावयाचा प्रस्ताव मी दिनांक १४/०३/२०१९ रोजी पदावधित अधिकारी, रायगड यांच्याकडे सर्व संबंधित कागदपत्रांसह सादर केला. सदर प्रस्तावावर माझी सही आहे. सदर प्रस्तावाची कार्यालयीन प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र. ६९** देण्यात येत आहे.

१७. मा. पदावधित अधिकारी, रायगड यांनी सदर प्रस्ताव दि. १४/०३/२०१९ रोजी मा. अन्न सुरक्षा आयुक्त यांना शिफारशीसह पाठविला. त्यावर श्री. दि. तु. संगत यांची सही आहे. सदर प्रस्तावाची अग्रेषित प्रत मी न्यायालयात सादर केली असून त्यास **निशाणी क्र. ७०** देण्यात येत आहे. सह आयुक्त आयुक्त (अन्न) मुख्यालय, अन्न आणि औषध प्रशासन (म. राज्य) यांनी सदर प्रकरणी न्यायालयात खटला दाखल करण्याचे आदेश दि. १९/११/२०१९ रोजी निर्गमित केले. सदर आदेशाची ई–मेल द्वारे प्राप्त झालेली प्रत मला पदावधित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (अन्न) रायगड, पेण यांचेमार्फत दि. १९/११/२०१९ रोजीच्या कव्हरिंग लेटरसह प्राप्त झाले. सदर पत्रामध्ये संबंधित आरोपीविरूद्ध मा. न्यायालयात विनाविलंब खटला दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. सदर कव्हरिंग लेटरवर श्री. ल. अं. दराडे यांची सही आहे. सदर खटला मंजुरी आदेशाची मूळ प्रत मला मा. पदावधित अधिकारी, रायगड यांचेमार्फत दि. २८/११/२०१९ रोजी प्राप्त झाली. सदर खटला मंजुरी आदेशाची मूळ प्रत मी न्यायालयात दाखल केली असून त्यास **निशाणी क्र**. **७१** देण्यात येत आहे.

१८. सदर आदेशाच्या अनुषंगाने मी दि. २०/११/२०१९ रोजी खटला दाखल केला आहे. आता मला मी दाखल केलेली तक्रार दाखवण्यात आली. ती तिच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकेन. आज रोजी आरोपी न्यायालयात उपस्थित आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. गणेश भगत यांचेमार्फत</u>** :

आरोपीतर्फे निशाणी क्र. ७२ कडील अर्जावरील आदेशान्वये **उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब** करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०४/०३/२०२६**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.